ePaper

# महाराष्ट्राचा घास काढून गुजरातला न्याल तर याद राखा—ठाकरे



| वर्ष - 7 । अंक - 314 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 4 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- बुमराह उपकर्णधारासाठी वाईट नव्हता!
- जॉली एलएलबी - 3 चित्रपटात ट्विस्ट!
- राहुल गांधी रायबरेलीतून लढणार!
- भाजपाला संविधान मान्य नाही!

## एसएसपीएमएसच्या मैदानावर राहुल गांधींची सभा

# मराठा, धनगर समाजाला आरक्षण!

### राहुल गांधी यांचे आश्वासनः काँग्रेस, इंडिया आघाडी घटना वाचवत आहे

। पुणे । महाईन्यूज

**देशात इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर जातनिहाय सर्वेक्षण केले जाणार आहे. जातनिहाय जनगणना हे क्रांतिकारक पाऊल आहे. त्यानंतर जनता जागरूक होईल आणि राजकारण बदलेल. तसेच आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवली जाईल. त्यामुळे मराठा, धनगर आणि अन्य लहान जातींना आरक्षण मिळेल, अशी भूमिका काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पुण्यात मांडली.पुणे लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी एसएसपीएमएसच्या मैदानावर आयोजित सभेत गांधी बोलत होते.**




राज्यघटना वाचवण्याची लढाई असल्याचे सांगून गांधी म्हणाले, की काँग्रेस, इंडिया आघाडी घटना वाचवत आहे. मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ राज्यघटना संपवत आहे. राज्यघटना संपवल्यास मागासवर्गीय, अल्पसंख्याकांना मिळणारे अधिकार हिरावले जातील. राज्यघटना नष्ट केल्यास देशाची ओळख राहणार नाही. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांनी जे देशाला दिले, ते संपवू देणार नाही, असे राहुल म्हणाले. शेतकऱ्यांना कर्जमाफी, हमीभाव मिळणार आहे. शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र कर्जमाफी आयोगाची निर्मिती केली जाणार असल्याचे ते म्हणाले.

### सभेला गर्दी

पुणे लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी एसएसपीएमएस महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या सभेसाठी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली. त्यामुळे मंगळवार पेठ, जुना बाजार परिसर, तसेच पुणे स्टेशन, बंडगार्डन रस्ता परिसरात वाहनांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले.

एसएसपीएमएस मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या सभेसाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, जिल्ह्यातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते आले होते. पदाधिकाऱ्यांकडे खासगी बसमधून कार्यकर्त्यांची ने-आण करण्याची व्यवस्था सोपविण्यात आली होती. मोटारीतून अनेक कार्यकर्ते उपस्थित राहिले होते.

सभेसाठी झालेल्या मोठ्या गर्दीमुळे मंगळवार पेठ, सोमवार पेठ, बंडगार्डन रस्ता, जुना बाजार, पुणे स्टेशन परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. सभेच्या ठिकाणी, तसेच परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### मोदी यांनी राजकारणाची चेष्टा चालवली आहे..

कर्नाटकमध्ये ४०० महिलांवर बलात्कार करणाऱ्या रवण्णाचा प्रचार पंतप्रधानांनी केला. मोदी यांनी राजकारणाची चेष्टा चालवली आहे. शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांवर काहीबाही बोलून अपमान करतात. मात्र, देशावर बोलत नाही, अशी टीका गांधी यांनी केली.

### रोखे घेणाऱ्यांची नावे का दडवली?

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे बेकायदा ठरवले. मोदी यांना राजकारण स्वच्छ करायचे होते, तर रोखे घेणाऱ्यांची नावे का दडवली? देशासमोर मोदी भ्रष्टाचार करत आहेत. देशात ऑक्सिजन, व्हेंटिलेटर नसताना लस तयार करणारी कंपनी मोदींना पैसे देत होती, अशी टीकाही त्यांनी केली.

## गद्दारांना, पक्ष फोडणाऱ्यांना त्यांची जागा दाखविण्याची वेळ!

### संजोग वाघेरे पाटील: तरुण, कामगार, शेतकरी, सर्वसामन्यांच्या प्रश्नांसाठी पाठिंबा देण्याचे आवाहन

। पनवेल ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

ज्यांनी गद्दारी केली. ज्यांनी पक्ष फोडला. आमदार पळवून महाविकास आघाडीचे सरकार पाडून नियमबाह्य सरकार बनवले. त्या सर्वांना त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. ते आपण सर्व मिळून करणार आहोत. त्या सोबतच तरुण, कामगार, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामन्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिवसेना (उद्धव



बाळासाहेब ठाकरे) आणि महाविकास आघाडीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहा, असे आवाहन मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी केले. पनवेल शहरात प्रचार दौरा केला. त्यावेळी तोंडोरे गाव येथे मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे जिल्हा प्रमुख प्रशांत पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक विजय पाटील, माजी नगरसेविका उज्वला पाटील, किरण दाबणे, विष्णू जोशी, माजी सरपंच बेंद्रे पाटील, शिवसेना विभाग प्रमुख हरेश पाटील, महेंद्र पाटील, गट प्रमुख भरत पाटील, शिवसेना पनवेल उपतालुका प्रमुख मनोज पाटील, उपशाखाप्रमुख वासुदेव पाटील, गट प्रमुख हर्षद पाटील, कैलास पाटील, नावडे येथील यशवंत खानोकर, विलास म्हात्रे, जेष्ठ शिवसैनिक अशोक खानवकर यांच्यासह ग्रामस्थ, जेष्ठ नागरिक, युवावर्ग, महिला पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विश्वासाला तडा जाऊ देणार नाही—वाघेरे

तसेच, गावागावांतील नागरिकांच्या हिताचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिकाऱ्याना घेवून ते तडीस नेण्याचा प्रयत्न करू, अशी मी तुम्हाला ग्वाही देतो. यापूर्वी ज्या प्रकारे तुमचा विश्वासाघात करण्याचे काम झाले. त्या पध्दतीने मी कुठेही तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. तुमचे प्रश्न सोडविण्यासाठी महाविकास आघाडीच्या माध्यमातून मी आपल्यासोबत असेन. त्यासाठी येणाऱ्या 13 तारखेला आपल्याला फक्त शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मशाल चिन्ह लक्षात ठेवा आणि प्रचंड बहुमतांनी विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

# शिरुरचे विद्यमान खासदार बोलघेवडे!

## कोणतेही विकासाचे प्रश्न मार्गी लावले नाहीत; आढळरावांची डॉ. कोल्हेवर टीका

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिरूर लोकसभा मतदार संघात महायुतीचा प्रचार जोमाने सुरू आहे. महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आज ऐतिहासिक व जागृत असणाऱ्या कुकडेश्वराचे दर्शन घेऊन जुन्नर तालुका दौऱ्याची सुरवात केली. यावेळी नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. महिलांनी औक्षण करुन स्वागत केले.दौऱ्यात महिला, तरुण-तरुणी यांनी मोठा सहभाग घेतला.**



"शिवाजी दादा तुम आगे बढो, हम तुम्हा रे साथ है" असा नारा देत इथल्या नागरिकांनी महायुतीला प्रचंड बहुमताने निवडून देण्याचा संकल्प केला.दरम्यान, या प्राचीन मंदिराच्या संवर्धन व देखभाल दुरुस्तीसाठी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे आमदार अतुल बेनके, आशा बुचके या सर्वांनी निधी मागितला असता अजितदादांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत पावणे तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. ग्रामस्थांच्या मार्गदर्शनाखाली आता काम देखील सुरु झाले असल्याचे आढळराव यांनी सांगितले. या नंतर निरगुडे येथील रोकडे फार्म हाऊस बेजवाट मध्ये कोपरा सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले," पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांमुळे देशाचा सर्वांगिण विकास होत आहे. त्यामुळे या निवडणुकीत आपल्याला मोदी यांच्या विकासात्मक धोरणाला साथ देणारा खासदार निवडून द्यायचा आहे. २०१९ ला त्यांच्या विरोधातला खासदार निवडून देण्याचे परिणाम तुमच्यासमोर आहेत. कुठल्याही गावात मी गेलो की मला सांगितले जाते विद्यामान खासदार मागील पाच वर्षांत एकदाही गावात आले नाहीत. त्यांनी कोणतेच विकासाचे प्रश्न मार्गी लावले नाहीत, फक्त बोलघेवडेपणा केला आहे, हे विसरू नका. पुढे बोलताना पाटील म्हणाले, विरोधक सांगत आहेत आपले संविधान बदलले जाणार आहे. हे साफ खोटे आहे, असे काहीही होणार नाही. आरक्षणाबाबतही गैरसमज पसरवले जात आहे. कोणीही आरक्षण किंवा संविधान याला हात लावू शकत नाही. काही घटकांनी आदिवासी नागरिकांची दिशाभूल करून भीती दाखवून आदिवासी नागरिकांचा फायदा घेतला. त्यांच्या विकासासाठी काहीही केले नाही. मोदीजी यांना समाजातील सर्वच घटकांचा विकास करायचा आहे. आता आपल्याला मोदीजी परत पंतप्रधान होणार असल्यामुळे त्यांच्या विचाराचा खासदार निवडून द्यायचा आहे, हे लक्षात असू द्या. घड्याळासमोरचे बटन दाबून मला विजयी करा अशी विनंती पाटलांनी केली. आमदार अतुल बेनके म्हणाले की,आढळराव दादांनी खासदार नसतानाही मतदारसंघात मोठा निधी खेचून आणला.विद्यमान खासदार मागच्या पाच वर्षांत आपल्याला दिसलेही नाहीत.अभिनेत्याला निवडून देण्यापेक्षा आपल्याला लोकांच्या मनातील नेत्याला प्रचंड बहुमताने निवडून द्यायचे आहे. आपल्या तालुक्यातून दादांना जास्तीत-जास्त मताधिक्या देण्याचा आपण सर्वजण प्रयत्न करु.

### दादांच्या विजयासाठी शर्थीचे प्रयत्न करू

» आमदार शरद सोनवणे म्हणाले की,आदिवासी भागात सर्वांत पहिले टॉवर शिवाजी दादांमुळेच झाले. शिवाजी दादांच्या विजयासाठी आपण सर्वांनी शर्थीचे प्रयत्न करूयात. दादा खासदार नसतानाही त्यांनी मोठा निधी आपल्या तालुक्याला मिळवून दिला आहे. आपला हक्काचा माणूस आपला खासदार झाला तर आपले सर्व प्रश्न हक्काने सोडविले जातील.

# पुणे शहर काँग्रेसचा पक्षांतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर!

## राहुल गांधींच्या सभेअगोदरच काँग्रेसच्या दोन स्थानिक नेत्यांमध्ये शाब्दिक चकमक

।पुणे
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या चारही उमेदवारांच्या प्रचारार्थ पुण्यातील एसएसपीएमएसच्या मैदानावर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची जाहीर सभा होत आहे. या सभेला काही तासांचा अवधी शिल्लक असतानाच काँग्रेसमधील दोन स्थानिक नेत्यांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून समजते आहे.**





पुणे लोकसभा निवडणुकीसाठी माहाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकर हे निवडणूक लढवत आहेत तर महायुतीकडून मुरलीधर मोहोळ हे रिंगणात उतरले आहेत. धंगेकरांची उमेदवारी जाहीर झाली त्या दिवसापासून शहर काँग्रेस पक्षांतर्गत वादाला तोंड फुटले आहे. एकतर धंगेकर यांच्या उमेदवारीला काहींचा विरोध होता. त्यामध्यें काँग्रेसचे नेते आबा बागुल हे अग्रस्थानी होते. त्यांनी बंड पुकारत आंदोलनही केले. त्यानंतर फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात आणि नाना पटोले यांनी समजूत काढल्यानंतर आबा बागुल यांनी त्यांची बंडाची तलवार म्यान केली. एकीकडे हे घडतअसताना मतदानाची तारीख जवळ आलेली असतानाही काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांमधील हेवेदावे मात्र, अजूनही कमी होताना दिसत नाही. त्यामुळे धंगेकरांच्या प्रचारात एकसंधपणा दिसत नसून धंगेकर 'सोशल मीडिया'वर महायुतीवर टीका करताना दिसत असले तरी. काँग्रेसच्याच अंतर्गत धुसफुसीने त्यांना ग्रासले आहे. रवींद्र धंगेकर यांना लोकसभेची उमेदवारी जाहीर होताच काँग्रेसमधील नाराजी नाट्य समोर आलं आहे. काँग्रेसचे नेते आणि सात टर्म नगरसेवक असलेले आबा बागुल यांचं व्हॉटस अप स्टेटस समोर आलं होतं. 'पुण्यात निष्ठेची हत्या ' म्हणत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. आबा बागुल हे देखील पुण्यातून काँग्रेसतर्फे लोकसभेची निवडणूक लढवण्यास इच्छूक होते. मात्र रवींद्र धंगेकर यांना तिकीट मिळाल्यानं आबा बागूल यांनी नाराजी व्यक्त केली.

पुण्यात काँग्रेसकडून रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यांनी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपच्या उमेदवाराचा पराभव केला होता. तर दुसरीकडे या मतदारसंघातून भाजपच्यावतीनं मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

त्यामुळे या मतदारसंघात मोहोळ विरोधात धंगेकर असा सामान रंगला आहे. मात्र दुसरीकडे धंगेकर यांना उमेदवारी जाहीर झाल्यानं पुणे काँग्रेसमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

### पोलीस अधिकाऱ्यांसमोर चकमक

राहुल गांधींची सभा असल्याने त्यांच्या बरोबर व्यासपीठावर स्थानिक नेत्यांपैकी कोण कोण बसणार यावरून शहराचा पदाधिकारी आणि राज्य पातळीवरील पदाधिकाऱ्यामध्ये शाब्दिक चकमक उडाल्याची माहिती आहे. व्यासपीठावर राहुल गांधींबरोबर बसणाऱ्या पदाधिकाऱ्यांनीही पोलिसांचे सुरक्षा पास आवश्यक आहे. ते घेतानाच त्यासाठी कोणाची नावे द्यायची यावरून या दोन पदाधिकाऱ्यांमध्ये पोलीस अधिकाऱ्यांसमोरच शाब्दिक चकमक झाली. शेवटी अधिकाऱ्यांनीच लवकर काय ते सांगा असे म्हटल्यानंतर वादाची मिटवामिटवी करण्यात आली. मात्र, जे सुरक्षा पास सकाळी मिळणार होते ते अगदी सभेच्या एक तास अगोदर देण्यात आले.

# बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य!

## सुनील शेळके : कर्जतमध्ये राष्ट्रवादीच्या मेळाव्यात निर्धार

। कर्जत ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य देण्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसची राहील, अशी ग्वाही मावळचे आमदार सुनील शेळके यांनी आज (शुक्रवारी) दिली.**



> देश कुणाच्या हातात द्यायचा. देशाचे पंतप्रधान कुणाला करायचे यासाठी ही निवडणूक आहे. महायुतीचा धर्म पाळत असताना किंवा मावळ विधानसभेचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना येणाऱ्या अडचणी जर सोडवायच्या असतील तसेच तालुक्याती महत्वाकांक्षी प्रकल्प जर मार्गी लावायचे असतील तर केंद्र आणि राज्य सरकारची मदत घ्यावी लागते. शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आहेत. तेही मार्गी लावण्यासाठी केंद्राची मदत घ्यावी लागणार आहे. एकवीरा देवस्थान, ग्लास स्काय वॉक प्रकल्प, असे अनेक मोठमोठे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आपल्या विचारांचा खासदार असायला हवा. म्हणून मावळात राष्ट्रवादीचा खासदार हवा होता. असे आम्हाला वाटत होते. मात्र बारणे यांची उमेदवारी जाहीर झाल्यामुळे त्यांचा प्रचार आम्ही प्रभावीपणे सुरू केला आहे.
>
> **-सुनील शेळके, आमदार, मावळ विधानसभा**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ कर्जत येथे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याच्या निमित्ताने रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले.

व्यासपीठावर खासदार बारणे, आमदार शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुधाकर घारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस हनुमंत पिंगळे, दत्तात्रय म्हसुरकर, अशोक भोपतराव, भगवान भोईर, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष उमाताई मुंडे, कर्जतचे तालुकाध्यक्ष भगवान चंचे, खालापूरचे तालुकाध्यक्ष संतोष बेलमारे तसेच एच आर पाटील, भरत भगत, शिवाजी खारीक, अंकित साखरे, रजनीताई धुळे, प्राची पाटील, संभाजी जगताप, स्वप्निल भालकर, अक्षय पिंगळे, भाई कोतवाल, हिराजी पाटील आधी पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार शेळके म्हणाले की, गेल्या लोकसभा निवडणुकीत मी स्वतः पार्थ पवार यांच्या विरोधात काम केले होते, तरी देखील अजितदादांनी मला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेतले. आमदार केले आणि मावळ तालुक्याच्या विकासासाठी सुमारे अडीच हजार कोटी रुपयांचा निधी देखील दिला. अशा नेत्याच्या शब्दासाठी आपण काहीही करू शकतो. अजित पवार यांनी मावळात धनुष्यबाण चालवण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य देण्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर आहे.

कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघात सुधाकर घारे यांच्या रूपाने एक कर्तृत्ववान तरुण न नेता राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाला आहे. या नेत्याला भविष्यात न्याय मिळावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम करावे, असे आवाहनही शेळके यांनी केले. खासदार बारणे यांनी तालुक्यात केलेल्या विविध विकास कामांचा आढावा सादर केला. कर्जत तालुक्यातील तुंगी सारख्या आदिवासी खेड्यात स्वातंत्र्यानंतर 70 वर्षांनी वीज आणि रस्ता पोहोचवता आला, याचा विशेष आनंद आहे, असं ते म्हणाले. अटल सेतू, मेट्रो यासारख्या मोठ्या कामांबरोबरच शासकीय योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. अजूनही याबाबत अनेक विकास कामे प्रस्तावित आहेत, असे त्यांनी सांगितले. मावळचे मतदार विकासाच्या बाजूनेच मतदान करतील, असा विश्वास बारणे यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीनंतरही महायुती कायम राहणार आहे. महायुतीच्या वतीने भविष्यात कोणाला संधी दिली जाईल, याचा निर्णय केंद्र व राज्याचे नेतृत्व घेईल. पण निवडणुकीत सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाची जाणीव आपण सदैव ठेवू, अशी ग्वाही बारणे यांनी दिली.

एकनाथ धुळे यांनी प्रास्ताविक केले. सुधाकर घारे, दत्तात्रय म्हसुरकर, उमाताई मुंडे, अशोक भोपतराव, हनुमंत पिंगळे, रंजना धुळे आदींची यावेळी भाषणे झाली.

# भोसरीमध्ये महायुतीच्या प्रचारासाठी भाजपाचा “जनसंवाद”

## आ. महेश लांडगे यांचा ‘घर टू घर’ प्रचार, आढळराव पाटील यांना मताधिक्य देण्याचा संकल्प

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ भाजपाच्या वतीने भोसरी विधानसभा मतदार संघात “जनसंवाद” बैठकांचा धडाका सुरु आहे.**





> ‘जनसंवाद..च्या माध्यमातून भाजपा- शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीय व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना बहुमताने निवडून देण्याचे आवाहन आम्ही करत आहोत. या निवडणुकीत मतदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास ठेवतील आणि भारत एक बलशाली राष्ट्र उभारणीच्या कार्यात योगदान करतील, असा विश्वास आहे. जनसंवाद बैठकांना नागरिकांकडुन मोठा प्रतिसाद मिळत असून आढळराव पाटील यांना भोसरी विधानसभेतून मताधिक्य मिळवून देण्याचा आमचा संकल्प आहे.
>
> **–महेश लांडगे, आमदार भोसरी विधानसभा, निवडणूक प्रमुख, शिरूर लोकसभा, भाजपा**

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्यावतीने भोसरी विधानसभा मतदारसंघातील विविध सोसायटी, वस्ती, गावठाण भागांमध्ये चौकाचौकात जनसंवाद बैठका घेण्यात येत असून नागरिकांचा या जनसंवाद मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

शिरूर लोकसभेच्या निवडणूक रिंगणात भाजपा-शिवसेना- राष्ट्रवादी- आरपीआय व घटक पक्ष महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील मैदानात आहेत. महायुतीच्या वतीने आढळराव पाटील यांचा प्रचाराचा जोर मतदारसंघात कायम आहे. त्यातच भोसरी विधानसभेचे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी आढळराव पाटील यांना 1 लाख मतांची आघाडी मिळवून देण्याचा संकल्प केला असून, ठिकठिकाणी जनसंवाद बैठका घेण्यात येत आहेत.

याद्वारे भारतीय जनता पार्टी व महायुतीचे केंद्र सरकार आणि देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने घेतलेली महत्त्वकांक्षी निर्णय, कल्याणकारी योजना आणि विकास प्रकल्प याबाबत तळागाळातील नागरिकांपर्यंत जनजागृती करण्यात येत आहे.




**कॉम्रेड शरद पाटील यांनी विसाव्या शतकाच्या शेवटी शहरी राजकारणावर जे भाष्य केले होते, ते आजही तंतोतंत लागू होते. शहराबरोबरच ग्रामीण भागालाही ते लागू पडतं.जातीच्या आधारावर मोजतात, हे वास्तव मतदारांनीदेखील मान्य केले आहे पण पक्षांनी उमेदवारीमध्ये विविध जातसमूहांना योग्य प्रतिनिधित्व दिले की नाही, हे तपासण्याइतका आपला मतदार अजूनतरी शहाणा नाही झाला, असेच म्हणावे लागेल काय?**

# उमेदवारभाऊ, तुही जात कंची ?



वंचित बहुजन आघाडीने लोकसभा उमेदवारांची नावे जातीसकट जाहीर केली आणि समाजमाध्यमांत विविध प्रकारच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या. काहींनी या नव्या प्रयोगाचे स्वागतसुद्धा केले, तर काहींनी जातीअंताची लढाई लढणाऱ्यांनीच स्वतःच्या उमेदवाराच्या नावापुढं जात घोषित का करावी असा प्रश्न उपस्थित केला.खरंतर प्रकाश आंबेडकर यांनी हे पहिल्यांदाच केले आहे असे नाही. २०१९ ला वंचित बहुजन आघाडीने निवडणुकांमध्ये उमेदवारी जाहीर करतानासुद्धा जातीसकटच यादी दिली होती. प्रकाश आंबेडकर यांना सामाजिक आणि राजकीय चळवळीचा चार दशकांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांची आजवरची कार्यशैली बघता त्यांनी हे जाणीवपूर्वक केले आहे. त्यातून त्यांना राज्याच्या राजकीय परिसंस्थेला एक संदेश द्यायचा आहे. ५० च्या दशकात “पिछड़ा पावे सौ में साठ” चा नारा देत समाजवादी नेते राममनोहर लोहिया यांनी ओबीसी, अनुसूचित जाती आणि जमातींना सत्तेत भागीदार बनवण्याचा नारा दिला. पुढे त्यांचेच शिष्य भारतरत्न कर्पूरी ठाकूर यांनी बिहारच्या सरकारमध्ये सामाजिक न्यायाचा पॅटर्न अंमलात आणला. महात्मा फुले यांनी ‘नाही रे’ वर्गाच्या सत्तेतल्या भागिदारीची मागणी केली ती आता देशभर जोर धरतेय. ८० च्या दशकात उत्तर प्रदेशमध्ये बहुजन समाज पार्टीचे सर्वेसर्वा कांशीराम यांनी “जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेदारी” हा नारा दिला आणि ठाकूर-ब्राम्हण, बनिया जातींचे वर्चस्व असणाऱ्या उत्तर प्रदेशसारख्या राज्यात बसपाला तीनदा सत्तेत आणले. त्यापैकी एकदा समाजवादी पक्षासोबत तर दुसऱ्यांदा भाजपबरोबर आघाडी सरकार स्थापले. ही आघाडी सरकारे स्थापन करताना त्यांनी बहुजन समाजामधील जातीच्या गणिताची जुळवाजुळव करण्याची काळजी घेतली. तिसऱ्यांदा मायावतींनी स्वबळावर सरकार आणले. प्रकाश आंबेडकरांचे राजकारण देखील वंचित जातसमूहाला सत्ताधारी करण्याची भाषा बोलते. याच भूमिकेतून त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला होता. सरंजामी मराठ्यांविरोधात गरीब मराठ्यांनी उठाव करावा अशी प्रकाश आंबेडकरांची भूमिका आहे.७० वर्षे एका विशिष्ट समाजातील १५० घराणीच आळीपाळीने महाराष्ट्राची सत्ता उपभोगत आली आहेत. मिळालेल्या सत्तेचा वापर करून सहकार, शिक्षण, आरोग्य, शेतीपूरकउद्योग क्षेत्रात संस्थांचे जाळे तयार करून स्वतःचा आर्थिक उत्कर्ष साधत आहेत. यासाठी सत्ता कायम आपल्याकडेच राहावी अशी त्यांची सरंजामी मानसिकता आहे. जोपर्यंत यात बदल होत नाही तोपर्यंत गरीब मराठे, ओबीसी आणि अनुसूचित जाती जमाती फक्त मतांसाठी वापरले जाणार. परंतु त्यांना सत्तेत स्थान आणि वाटा मिळणारच नाही, अशी आंबेडकरांची मांडणी आहे.राखीव मतदारसंघात आणखी एक पॅटर्न दिसून येतो. अनुसूचित जातीसाठी राखीव असणाऱ्या मतदारसंघात भाजपप्रणित महायुतीकडून आंबेडकरी चळवळीतील किंवा बौद्ध समाजातील कार्यकर्त्यांना लोकसभेमध्ये उमेदवारी मिळत नाही. शिवसेना आणि भाजप राखीव मतदारसंघात नेहमीच बौद्धेत्तर दलित समाजाचे उमेदवार देतात.जेव्हा कधी वंचित बहुजनांचं राजकारण उभं राहते तेव्हा तेंव्हा ते आघाडी करून लवकरात लवकर गिळून टाकता येईल याकडे प्रस्थापित पक्षांचं लक्ष असत. महाविकास आघाडीकडून वंचितवर भाजपची बी टीम असल्याचा वारंवार आरोप होतो. पण मुळात स्वतः शिवसेना ही भाजपची जुनी सहचारिणी राहिली आहे. २०१९ मध्ये शरद पवारांनी भाजपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता. सध्या कॉंग्रेसच्याच प्रस्थापित नेत्यांपैकी कोण कधी भाजपला जाऊन मिळेल हे सांगता येत नाही. आम्ही याचकाच्या भूमिकेतून राजकारण करणारे नाही. प्रस्थापित पक्षांच्या ‘आम्ही देणार, तुम्ही घेणार’ या वर्चस्ववादी वृत्तीला ते धक्के देतात.

## संपादकीय »

# या गॅरंटीचे काय?

***मुंबईत, रुग्णालयात बाळंतपणादरम्यान एका मातेचा बाळासह मृत्यू होणे, ही खरे तर सगळयांनाच शरमेने मान खाली घालायला लावणारी घटना आहे.***

देशाची आर्थिक राजधानी, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याची राजधानी, अशी बिरुदे मिरवणाऱ्या मुंबईत, पालिका रुग्णालयात बाळंतपणादरम्यान एका मातेचा बाळासह मृत्यू होणे, ही खरे तर सरसकट सगळयांनाच शरमेने मान खाली घालायला लावणारी घटना आहे. एकीकडे याच शहरात वेगवेगळया शाखांमधले सुपरस्पेशालिटी डॉक्टर्स, सुपरस्पेशालिटी रुग्णालये उपलब्ध आहेत, देशाच्या कानाकोपऱ्यातून उपचारांसाठी रुग्ण येथे धाव घेत असतात, मेडिकल टुरिझम म्हणजेच वैद्यकीय पर्यटन ही संकल्पनाही आपल्याकडे चांगली रुळलेली असल्यामुळे इथल्या तुलनेत किफायतशीर आणि तज्ज्ञ उपचारांसाठी दरवर्षी जवळपास ७८ देशांमधून २० लाख रुग्ण वेगवेगळया शाखांमधल्या उपचारांसाठी भारतात येत असतात. असे सगळे असणाऱ्या शहरात, देशात एक साधे बाळंतपण निर्धोक असू नये?

म्यानमार हा आपला शेजारी देश २०२१ पासून पुन्हा लष्करशाहीच्या ताब्यात गेला, तेव्हापासून तिथे अस्थैर्य आहे. लोकांचे गट लष्करशाहीशी प्राणपणाने लढत आहेत. याकडे भारतासारख्या देशाने फार लक्ष पुरवले नसले तरी म्यानमारच्या पूर्वेकडले थायलंडसारखे देश परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत.

# म्यानमारकडे शांतताप्रेमींचे लक्ष हवे..

म्यानमारच्या लष्करशाहीची ताकद कमी होत असल्याचे विधान थायलंडचे पंतप्रधान श्रेट्ठा थाविसिन यांनी ‘रॉयटर्स’ या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत केले, ही महत्त्वाची घडामोड ठरते. या विधानाला ताजा संदर्भ आहे तो म्यानमारच्या पूर्व सीमेवरील करेन प्रांतातले म्यावाडी हे शहर लष्कराच्या ताब्यातून गेल्याचा. इथल्या लोकांनी लष्करशाहीच्या प्रतिनिधींना इथून हुसकून लावले. पण या प्रकारची लढाई गेले सुमारे सहा महिने सुरू आहे. स्वतःला ‘नॅशनल युनिटी गव्हर्नमेंट’ (एनयूजी) म्हणवणारे इथले परागंदा प्रतिसरकार, त्याला पाठिंबा देणाऱ्या संघटना, म्यानमारमध्ये राहणारे किंवा देश सोडावा लागलेले राजकीय कार्यकर्ते आणि पत्रकार, या सर्वांचाही असा सूर आहे की, लष्करशाही खचते आहे. या सुराला अन्य देशाच्या पंतप्रधानांनीही अनुमोदन देणे ही साधी बाब नाही. म्यानमारच्या लष्करशाहीचे दिवस आता भरलेच, अशा हिशेबाने



काही प्रमुख कार्यकर्ते तर ‘आता नव्या- पर्यायी व्यवस्थेच्या तयारीला लागा’ असेही म्हणू लागले आहेत. पण प्रश्न असा की, खरोखरच म्यानमारची लष्करशाही खचते आहे काय? या देशात आज लोकप्रतिनिधी नाहीत. लोकप्रतिनिधिगृह नाही. लष्करशाहीने ‘म्यानमार स्टेट ॲडमिनिस्ट्रेशन कौन्सिल’ ही नवीच राजकीय यंत्रणा निर्माण केली आहे आणि तिच्यामार्फत कारभार चालतो. काही शहरांतून, काही लष्करी तळांवरून आणि काही चौक्यांतून लष्कराला मागे फिरावे लागले- म्हणजे लोकांनी त्यांना हुसकून लावले- हे खरेच आहे.लष्करशाहीने लोकांचा पाठिंबाही गमावल्याचे चित्र दिसू लागले आहे. सक्तीच्या लष्करी सेवेची भरती प्रक्रिया १० फेब्रुवारीपासून म्यानमारमध्ये सुरू झाली. पण आजही तरुण भरती होईनात, अशी स्थिती आहे. उलटपक्षी, भरतीच्या या सक्तीमुळे तरुणांमध्ये लष्करशाहीबद्दल चीड वाढली असून या संतापामुळे ते बंडखोरांकडे आकृष्ट होऊ शकतात. याची जाणीव लष्करशाहीला नाहीच, असेही नाही. ती आहे, म्हणून तर लष्करी अधिकाऱ्यांनी विविध जमातींशी पुन्हा शस्त्रसंधी करण्याची धावाधाव सुरू केलेली आहे. जमातींशी लष्करशाही करत असलेल्या या शस्त्रसंधींना एक चौकट आहे. याआधीच्या लष्करशाहीने २०१५ साली ही चौकट आखून दिली. त्या करारनाम्यानुसार, म्यानमारमधील ज्या जमातींकडे स्वतःची सशस्त्र संघटना (एथ्निक आम्र्ड ऑर्गनायझेशन-ईएओ) आहे, त्यांनी सत्ताधाऱ्यांना सहकार्य करण्याचा किंवा किमान विरोध न करण्याचा हा करार. तो दहापैकी सात ‘ईएओं’शी करण्यात लष्करशाहीला अलीकडे पुन्हा यश आलेले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भाजपाला संविधान मान्य नाही!

## आदित्य ठाकरेंची मोदी सरकारवर सडकून टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपा सरकार हे चायनीज मॉडेलवर चालत असून ते चीनला डोळ दाखवायला घाबरते, अशी टीका ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली आहे. तसेच उद्धव ठाकरेंना आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्री बनवायचे होते, या अमित शाहांच्या आरोपालाही त्यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. आदित्य ठाकरे यांनी नुकताच एबीपी न्यूजला मुलाखत दिली. यावेळी ते बोलत होते.**



या मुलाखतीत आदित्य ठाकरे यांनी केंद्रातील मोदी सरकार आणि भारतीय जनता पक्षावर सडकून टीका केली. “आजची भाजपा ही जुनी भाजपा नाही. आजची भाजपा ही चायनीज मॉडेलवर चालत आहे. ज्या चीनला डोळे दाखवायला केंद्रातील मोदी सरकार घाबरते, मात्र, त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न या सरकारडून सुरू आहे”, असे ते म्हणाले.भाजपाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान मान्य नाही. त्यांना लोकशाही मान्य नाही. आज देशातील महिला घाबरलेल्या आहेत. कर्नाटकातलं उदाहरण ताजे आहे. कर्नाटकमधील रेवन्ना प्रकरण भयंकर आहे. भाजपाने मुंबईतही अशाच एका उमेदवाराला तिकीट दिलं आहे”, अशी टीकाही आदित्य ठाकरे यांनी केली.दरम्यान, शिवसेनेत फूट पडली, कारण उद्धव ठाकरे आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्री बनवणार होते, असा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केला होता. या आरोपालाही आदित्य ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले. “अमित शाह यांच्या आरोपात काहीही तथ्य नाही. त्यांना आरोपच करायचे असतील तर ते करू शकतात. पण शिवसेना का आणि कोणी फोडली, महाराष्ट्रातील जनतेला माहिती आहे. आज बाहेरचे लोक येऊन असली शिवसेने आणि नकली शिवसेना कोणती हे सांगत आहे. महाराष्ट्र हे कधीही सहन करणार नाही”, असेही ते म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरूनही ताशेरे ओढले. “निवडणूक आयोग आज पूर्ण भाजपाच्या इशाऱ्यावर काम करत आहे. आमचा पक्ष दोन गटात विभागला गेला, तेव्हा त्याचा रिपोर्ट त्यांनी भाजपाच्या सांगण्यावरून लिहिला होता. आज निवडणूक आयोगाने आम्हाला जय भवानी जय शिवाजी हा नारा लाऊ नये, असा आदेश दिला आहे. जय भवानी जय शिवाजी हे नारा महाराष्ट्रात नाही द्यायचा तर कुठे म्हणायचं? एकंदरितच या लोकांचा महाराष्ट्र द्वेष पुढे आला आहे”, अशी प्रतिक्रिया त्यांनी केली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये शरद पवारांवरही टीका केली होती. ज्यांना आपले कुटुंब सांभाळता आले नाही, ते राज्य काय सांभाळणार? असे मोदी म्हणाले होते. या टीकेचा समाचार घेताना संजय राऊत म्हणाले, उद्या भाजपाची सत्ता गेल्यानंतर यापेक्षा वाईट कलह त्यांच्या पक्षात निर्माण होणार आहे. हे लिहून ठेवा. नरेंद्र मोदी किंवा अमित शाह हे ब्रह्मदेव नाहीत. राम आणि कृष्णही आले आणि गेले. तिथे मोदी आणि शाह कोण?उद्धव ठाकरे यांच्याबाबत जवळीक दाखवून मोदींनी उबाठा गटासाठी पुन्हा एकत्र येण्याची जागा निर्माण केली आहे का? असा प्रश्न यावेळी संजय राऊत यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, पंतप्रधान मोदींनी आमच्यासाठी खिडकीच काय दरवाजे उघडले तरी आम्ही त्यांच्या दारात उभे राहणार नाहीत. महाराष्ट्रात स्वाभिमान नावाची गोष्ट शिल्लक आहे. याचा अर्थ नरेंद्र मोदी आता निवडणुकीत पराभूत होत आहेत, त्यांना बहुमत मिळत नाहीये. म्हणून ते आता फटी, दरवाजे आणि खिडक्या उघडण्याचा प्रयत्न करत आहेत.

### त्यांच्या दारात उभे राहणार नाही

उद्धव ठाकरे हे माझे शत्रू नाहीत, असे विधान नुकतेच पंतप्रधान मोदी यांनी एका मुलाखतीदरम्यान केले. या विधानानंतर राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा भाजपा-ठाकरे एकत्र येणार का? अशी चर्चा सुरू झाली असताना शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी मात्र ही चर्चा पूर्णपणे फेटाळून लावली. सांगली येथे चंद्रहार पाटील यांचा प्रचार करण्यासाठी आले असताना संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. “नरेंद्र मोदी खोटं बोलत आहेत. नरेंद्र मोदी अडचणीतले व्यापारी आहेत. अडचणीत आलेला व्यापारी आपल्या फायद्यासाठी खोटं बोलतो, असे चाणक्याने सांगितले आहे”, अशा शब्दात संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली.“पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रेमाचा पान्हा एवढा फुटला असता तर त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना अशाप्रकारे तोडली नसती. त्यांनी शिवसेना नुसती तोडली नाही तर बाळासाहेबांच्या शिवसेनेचे नाव आणि चिन्ह एका बेईमान माणसाला देण्याचं कृत्य केलं नसतं.उद्धव ठाकरे यांच्याबाबत जवळीक दाखवून मोदींनी उबाठा गटासाठी पुन्हा एकत्र येण्याची जागा निर्माण केली आहे का? असा प्रश्न यावेळी संजय राऊत यांना विचारण्यात आला.

---

# नाती तोडायला ताकद लागत नाही : सुप्रिया सुळे

## यापुढे रोहितच्या आईवर बोलाल, तर ‘करारा जवाब मिलेगा

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी मतदान होत आहे. त्यामुळे प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे आजवरच्या प्रथेप्रमाणे प्रचाराच्या शेवटच्या दिवसांत बारामतीमध्ये सभा घेत असतात.**

त्याप्रमाणे आज बारामतीमध्ये शरद पवार गटाची सभा संपन्न झाली. या सभेला सुप्रिया सुळे यांच्यासह त्यांची आई प्रतिभा पवार, आमदार रोहित पवार आणि इतर नेते उपस्थित होते. या सभेत बोलत असताना सुप्रिया सुळे काहीप्रसंगी भावूक तर काही प्रसंगी अतिशय आक्रमक होताना दिसल्या. कुणाचेही नाव न घेता त्यांनी आपल्या भाषणात विरोधकांवर जोरदार टीका केली. “मागच्या दहा महिन्यांपासून मी सहन करतेय. पण आता कधीतरी उद्रेक होईल”, असे सांगून त्यांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला.सुप्रिया सुळे आपल्या भाषणाच्या सुरुवातीला म्हणाल्या, “मी पैशांसाठी सत्तेत आलेले नाही. कितीही पैसे कमवले तरी आपण काकडीची कोशिंबीर




खातो. कुणीही सोन्याची कोशिंबीर खात नाही. आपण मोकळ्या हाती आलो आणि मोकळ्या हातांनीच परत जाणार आहोत. जगण्यासाठी आपल्याला नाती लागतात. नाती तोडायला ताकद लागत नाही. पण नाती जोडायला ताकद लागते. तुम्ही समोरून वार करत आहात. मलाही ‘आरे ला कारे’ करता येतं. पण आरे ला कारे न करता, गप्प बसून सहन करायला जास्त ताकद लागते. ही ताकद एका महिलेतच असते.” माझ्या आधी रोहितने भाषण केलं. त्याच्या आईबद्दल विरोधकांकडून उल्लेख झाला, त्याबद्दल त्याने नाराजी व्यक्त केली. माझीही तिच भावना आहे. कुणाच्याही आईबद्दल अपशब्द काढू नयेत. बाकी सगळं खपवून घेऊ, पण आईबद्दल बोलाल तर खपवून घेणार नाही. पहिल्यांदा तुम्ही आईवर बोललात. पण जर आता यापुढे माझ्या किंवा रोहितच्या आईवर बोलाल, तर ‘करारा जवाब मिलेगा’. ही धमकी नाही, तर हे मी प्रेमाने सांगत आहे”, असा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी सूचक इशारा दिला. आम्ही बोलत नाही, याचा अर्थ आमच्यात ताकद नाही, असा गैरसमज कुणी करू नये.

### इतकंही करू नका की उद्रेक होईल

मनगटाच्या ताकदीबद्दल बोललं गेलं. तर मी स्पष्ट करते, माझ्या हातात ज्या बांगड्या आहेत, त्या शारदाबाई पवार यांच्या आहेत आणि मी त्यांची नात आहे, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, “माझ्यावर अनेक वार होत आहेत, पण मी ते सहन करते. आमच्या घरावर तर रोज टीव्हीवर चर्चा सुरू असते. आज कुणी हे बोललं, कुणी ते बोललं. मी आता या चर्चेच्या खोलात जाणार नाही. कारण या सर्वांची उत्तरं माझ्याकडं आहेत, पण मी देणार नाही.

# राहुल गांधी रायबरेलीतून लढणार!

## अमेठीतून काँग्रेसकडून के.एल. शर्मा यांना उमेदवारी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अनेक दिवस चालढकल केल्यावर राहुल गांधींची दुसरी उमेदवारी अखेर जाहीर झाली आहे. राहुल यंदा अमेठीतून नव्हे तर रायबरेलीतून निवडणूक लढवणार आहेत. तर अमेठीतून गांधी कुटुंबीयांचे विश्वासू के.एल. शर्मा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान, अर्ज भरण्याची मुदत आज संपत आहे. त्यामुळे राहुल गांधी आज दुपारीच अर्ज भरणार आहेत. प्रियांका गांधी देखील त्यांच्यासोबत असणार आहेत.**



शक्तिप्रदर्शनासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली आहे. गांधी घराण्यातल्या दिग्गज नेत्यांचा एकेकाळचा गड अर्थात उत्तर प्रदेशातील अमेठी मतदारसंघातून गांधी कुटुंबीयांचे विश्वासू के.एल. शर्मा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आजच राहुल गांधींची रायबरेलीतून उमेदवारी जाहीर झाली आहे. रायबरेली आणि अमेठीतून आज अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे परंतु आतापर्यंत उमेदवारी जाहीर झाली नव्हती. सकाळीच काँग्रेसने परिपत्रक प्रसिद्ध करत राहुल गांधींना उमेदवारी जाहीर केली. कालपर्यंत अमेठीतून राहुल गांधी निवडणूक लढवणार असल्याच्य चर्चा होत्या. परंतु आता ते रायबरेलीतून निवडणूक लढवणार आहे. अमेठीपेक्षा रायबरेली हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. 2019 साली रायबरेलीमधून सोनिया गांधी निवडून आल्या होत्या. रायबरेलीत कायम काँग्रेसचा उमेदवार निवडून आलेला आहे. त्यामुळे रायबरेली मतदारसंघ हा काँग्रेसचा गड आहे . अमेठीचे बदलली गणित पाहता गेल्या निवडणुकीत या मतदारसंघात भाजपचा वोच शेअर जवळपास 49 टक्के मते मिळाली होती. काँग्रेसचा वोट शेअर हा 40 ते 43 टक्के होता. रायबरेलीच्या बाबतीत चित्र वेगळे आहे. रायबरेलीत काँग्रेसचा वोट शेअर हा 45 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. तर भाजपचा वोट शेअर हा 33 टक्के होता. त्यामुळे रायबरेली हा मतदारसंघ काँग्रेससाठी जास्त सोईस्कर आहे. मूळ या सगळ्यामागचा मुद्दा होता की, गांधी घराण्यातील कोणीतरी उत्तर भारतातून लोकसभेची जागा लढवावी. कारण उत्तर भारतात काँग्रेसची पकड सैल आणि भाजपची पकड मजबूत होत चालली आहे. कारण काँग्रेसच्या मोठ्या नेत्यांनी उत्तर भारताकडे पाठ फिरवली तर संपूर्ण उत्तर भारत भाजपच्या हातात येईल, असे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे होते. त्यामुळे रायबेरली, अमेठी किंवा उत्तर भारतातून गांधी घराण्यातील उमेदवार असा आग्रह होता. रायबरेलीतून प्रियंका गांधी आणि अमेठीतून राहुल गांधीच्या चर्चा होत्या.मात्र दोघांनी सुरुवातीला निवडणूक लढवण्यास नकार दिला. मात्र सोनिया गांधींच्या मध्यस्तीनंतर राहुल गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार आहेत.शक्तिप्रदर्शनासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली आहे. गांधी घराण्यातल्या दिग्गज नेत्यांचा एकेकाळचा गड अर्थात उत्तर प्रदेशातील अमेठी मतदारसंघातून गांधी कुटुंबीयांचे विश्वासू के.एल. शर्मा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आजच राहुल गांधींची रायबरेलीतून उमेदवारी जाहीर झाली आहे. रायबरेली आणि अमेठीतून आज अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे परंतु आतापर्यंत उमेदवारी जाहीर झाली नव्हती. सकाळीच काँग्रेसने परिपत्रक प्रसिद्ध करत राहुल गांधींना उमेदवारी जाहीर केली.

### राहुल गांधींची निवडणुक कारकीर्द

2004 साली राहुल गांधींना 3 लाख 90 हजार 179 मतं पडली तर 2 लाख 90 हजार 853 मतांनी त्यांचा विजय झाला. तसेच, 2009 साली त्यांना 4 लाख 64 हजार 195 मतं पडली तर 3 लाख 70 हजार 198 मतांनी ते विजयी झाले. 2014 साली त्यांना 4 लाख 8 हजार 691 मतं मिळाली आणि ते 1 लाख 7 हजार 903 मतांनी विजयी झाले. मात्र, 2019 त्यांना 4 लाख 13 हजार 394 मतं पडली आणि 55 हजार 120 मतांनी त्यांचा पराभव झाला.अनेक दिवस चालढकल केल्यावर राहुल गांधींची दुसरी उमेदवारी अखेर जाहीर झाली आहे. राहुल यंदा अमेठीतून नव्हे तर रायबरेलीतून निवडणूक लढवणार आहेत. तर अमेठीतून गांधी कुटुंबीयांचे विश्वासू के.एल. शर्मा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान, अर्ज भरण्याची मुदत आज संपत आहे. त्यामुळे राहुल गांधी आज दुपारीच अर्ज भरणार आहेत. प्रियांका गांधी देखील त्यांच्यासोबत असणार आहेत. शक्तिप्रदर्शनासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली आहे. गांधी घराण्यातल्या दिग्गज नेत्यांचा एकेकाळचा गड अर्थात उत्तर प्रदेशातील अमेठी मतदारसंघातून गांधी कुटुंबीयांचे विश्वासू के.एल. शर्मा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आजच राहुल गांधींची रायबरेलीतून उमेदवारी जाहीर झाली आहे.

# रेवण्णा यांच्या विरोधात 'लुकआउट' नोटीस

## रेवण्णा परदेशात गेल्याची माहिती मिळताच नोटीस जारी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कथित लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी आणि हासन मतदारसंघाचे खासदार व भाजप-जनता दल (धर्मनिरपेक्ष) युतीचे लोकसभा उमेदवार प्रज्वल रेवण्णा यांच्या विरोधात लुक आउट नोटीस जारी करण्यात आली असल्याची माहिती कर्नाटकचे गृहमंत्री डॉ. जी. परमेश्वरा यांनी गुरुवारी दिली.**



प्रज्वल रेवण्णा सध्या परदेशात असून या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकासमोर (एसआयटी) हजर राहण्यासाठी आणखी सात दिवसांची मागणी केली आहे. मात्र, त्यासाठी २४ तासांपेक्षा जास्त वेळ देण्याची तरतूद नाही, असे परमेश्वरा यांनी सांगितले. "प्रज्वल रेवण्णा परदेशात गेल्याची माहिती मिळताच लुकआउट नोटीस जारी करण्यात आली आहे. आम्ही सर्व बंदरे आणि विमानतळांना लुकआउट नोटीसबद्दल माहिती दिली आहे," असे त्यांनी यांनी पत्रकारांना सांगितले. समाज माध्यमांवर प्रसारित झालेल्या आक्षेपार्ह ३००० ध्वनीफिती आणि छायाचित्रे याप्रकरणी रेवण्णा यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या लैंगिक शोषणाच्या गुन्ह्याच्या चौकशीसाठी कर्नाटक सरकारने विशेष चौकशी पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. हासन लोकसभा मतदारसंघातून ते राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार आहेत. या जागेसाठी २६ एप्रिल रोजी मतदान झाले आहे. गृहमंत्री परमेश्वर पुढे म्हणाले, "एसआयटी सदस्य रेवण्णा यांना दिलेल्या वेळेबाबत कायदेशीर मत घेत आहेत. २४ तासांपेक्षा जास्त वेळ देण्याची तरतूद नसल्याने एसआयटी त्यांना अटक करण्यासाठी पावले उचलणार आहे. याआधी एका महिलेने प्रज्वल आणि त्याच्या वडिलांविरोधात लैंगिक छळाची तक्रार दाखल केली होती. ते म्हणाले की, प्रज्वलविरोधात आणखी एका पीडितेने तक्रार दाखल केली आहे.बेंगळूरु : कथित लैंगिक शोषणाची चित्रफीत जारी करणारा रेवण्णांचा माजी कार चालक सध्या मलेशियामध्ये आहे. माजी मुख्यमंत्री एच डी कुमारस्वामी यांनी अशा हालचालींमागील हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### रेवण्णांचा चालक मलेशियात

चालक कार्तिकने मंगळवारी जारी केलेल्या चित्रफितीमध्ये म्हटले आहे की, त्याने भाजप नेते देवराजे गौडा व्यतिरिक्त इतर कोणालाही कथितरित्या रेवण्णा यांचा समावेश असलेली चित्रफीत आणि छायाचित्रे दिलेली नाहीत. उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यावर प्रज्वल रेवण्णा यांच्याशी संबंधित अश्लील चित्रफीत जारी केल्याचा आरोप करणाऱ्या जनता दल (सेक्युलर) च्या कर्नाटक युनिटचे अध्यक्ष कुमारस्वामी यांनी चालक कार्तिकच्या मलेशिया दौऱ्यामागे शिवकुमार आणि त्यांचा भाऊ आणि काँग्रेस खासदार डीके सुरेश यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# सैफ अली खानला अमृता सिंह नेमकं काय म्हणाली

दीपक तिजोरी हा ९० च्या दशकातील बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता होता. एकेकाळी चाहत्यांच्या मनावर राज्य करणारा हा अभिनेता आता सिनेसृष्टीत फारसा सक्रिय नाही, पण लवकरच तो 'टिप्सी' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तो सध्या त्याच्या या आगामी चित्रपटाचे प्रमोशन करत आहे, त्याने १९९० च्या दशकातील हिंदी चित्रपट उद्योगाबद्दल मत मांडलं. तसेच त्याकाळी कलाकार एकमेकांना मदत करायचे, पाठिंबा द्यायचे, याचा उल्लेखही त्याने केला. दीपकने सैफ अली खान व त्याची तेव्हाची पत्नी अभिनेत्री अमृता सिंह यांचा एक किस्सा सांगितला. दीपकने 'पहला नशा' चित्रपटातून पदार्पण केलं होतं. या चित्रपटासाठी सैफ त्याला सपोर्ट करत होता, पण अमृताने त्याला मदत करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला होता, या घटनेमुळे आपल्याला धक्का बसला होता, असं दीपकने म्हटलंय. नेमकं काय घडलं होतं, ते जाणून घेऊयात.दीपकने सांगितलं की त्याच्या पहिल्या चित्रपटात कॅमिओसाठी त्याच्या काही सेलिब्रिटी मित्रांची मदत हवी होती. त्यावेळी आमिर खान, शाहरुख खान आणि सैफ अली खान यांनी त्याला पाठिंबा देण्यासाठी येणार असल्याचं वचन दिलं होतं. पण याच दरम्यान घडलेल्या एका प्रसंगाने दीपकला धक्का बसला होता, याबद्दल त्याने झूमला दिलेल्या एका मुलाखतीत सांगितलं. "एक वेळ अशी आली होती, ज्यामुळे मी खरंच आश्चर्यचकित झालो होतो... शाहरुख (खान), सैफ (अली खान) आणि आमिर हे तिघेही येणार होते. तर सैफ घरी तयार होत होता, तो घरी तयार होत असताना त्याची तेव्हाची पत्नी डिंगीने (अमृता सिंह) त्याला विचारलं, 'तू काय करतोय? तू कुठे जातोय?"सैफने त्यावेळी अमृताला दीपकच्या चित्रपटाबद्दल सांगितलं. त्यानंतर अमृताने त्याला जाऊ नकोस असं म्हटलं. अमृता सैफला काय म्हणाली होती, तेही त्याने सांगितलं. "तर, ती म्हणाली, 'खरंच? तू असं कसं करू शकतो? आम्ही या सर्व गोष्टी कधीच केल्या नाहीत. हे कोण करतं? तसं असेल तर प्रीमियर शूटवर जा आणि कोणाला तरी सपोर्ट कर." तिचं हे बोलणं ऐकून मला धक्का बसला होता, कारण ९० च्या दशकात बॉलीवूडमधील कलाकार एकमेकांना सपोर्ट करायला जायचे, आता तसं होत नाही, हे पाहून वाईट वाटतं, असं दीपक म्हणाला.

## मनीषा कोईरालाचं जोडीदाराबाबत विधान

९० च्या दशकात आपल्या सौंदर्याने व अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारी अभिनेत्री मनीषा कोईराला अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय आहे. मनीषा संजय लीला भन्साळी यांच्या 'हीरामंडी' वेब सीरिजमध्ये महत्वाच्या भूमिकेत आहे. या सीरिजच्या निमित्ताने अभिनेत्रीने दिलेल्या मुलाखतीत मनीषाने वैयक्तिक आयुष्य व जोडीदाराबद्दल मत व्यक्त केलं आहे.झूम टीव्ही'ला दिलेल्या मुलाखतीत मनीषा कोईराला म्हणाली, "काही लोक भाग्यवान असतात ज्यांना आयुष्यात इतकं यश मिळतं, आयुष्यात फार कमतरता नसतात आणि त्यांचं जीवन शांत असतं. मी नशीबवान आहे की माझ्याकडे या सगळ्या अनुभवांचं मिश्रण आहे. निदान माझा जीवनाकडे पाहायचा दृष्टीकोन कडवट नसेल इतकीच मी आशा करू शकते आणि त्यावर माझं काम सुरू आहे. मी काय बदलू शकते आणि मी आयुष्याकडे कसे पाहते, यावर काम करतेय. आयुष्य त्रासदायक आहे का? नाही. आयुष्यातील अशा भयंकर आघाताचे अनुभव घेण्याच्या बाबतीत जास्त श्रीमंत झालेय, असं मला वाटतं."तुला आयुष्यात पुन्हा प्रेमात पडायचं आहे का? किंवा जोडीदार पुन्हा हवा आहे का? असं विचारल्यावर ५३ वर्षांची मनीषा म्हणाली, "होय. मी खोटं बोलत नाही असं म्हटलं तर मी खोटे बोलेन. जोडीदार असता तर तो भेटल्यावर मला आनंद झाला असता.

## अनुष्काच्या वाढदिवशी खास पोस्ट



'रब ने बना दी जोडी' या चित्रपटातून अभिनेत्री अनुष्का शर्माने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. आपल्या सहज सुंदर अभिनयाने तिने सर्वांनाच भुरळ घातली. बॉलीवूडमध्ये जम बसवल्यावर वैयक्तिक आयुष्यात अनुष्काने २०१७ मध्ये भारतीय फलंदाज विराट कोहलीशी लग्नगाठ बांधली. या दोघांची जोडी फक्त देशातच नव्हे तर जगभरात लोकप्रिय आहे. आजची तरुणपिढी विरुष्काला आदर्श जोडपं मानते. आज अनुष्का शर्मा तिचा ३६ वा वाढदिवस साजरा करत आहे. यानिमित्ताने विराटने खास इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत आपल्या पत्नीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.अनुष्काचा जन्म १ मे १९८८ रोजी झाला. आर्मी स्कूलमधून शिक्षण पूर्ण केल्यावर पुढे तिने अभिनय क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला. आजच्या घडीला अनुष्काचं स्वत:चं प्रोडक्शन हाऊस सुद्धा आहेत. याद्वारे तिने 'एनएच १०', 'परी', 'फिलोरी', 'बुलबुल' यांसारख्या चित्रपटांची निर्मिती केली आहे. आपल्या लाडक्या बायकोला शुभेच्छा देण्यासाठी विराटने त्याच्या सोशल मीडियावर एकूण चार फोटो शेअर केले आहेत. यातील पहिले दोन अनुष्काचे सोलो फोटो आहेत. तर, उर्वरित दोन विरुष्काचे दोघांचे पाठमोरे फोटो आहेत.माझ्या आयुष्यात जर तू आली नसतीस तर, कदाचित मी स्वत:ला पूर्णपणे हरवून बसलो असतो. तुला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा माय लव्ह! माझं आयुष्य तू सर्वार्थाने उजळून टाकलं आहेत. आम्ही ( विराट व मुलं ) तुझ्यावर खूप प्रेम करतो." अशी पोस्ट शेअर करत विराटने अनुष्काला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. विराट-अनुष्काला काही दिवसांपूर्वी मुलगा झाला. २०२१ मध्ये अनुष्काने वामिकाला जन्म दिला. तर, यावर्षी १५ फेब्रुवारीला या जोडप्याच्या घरी चिमुकल्या पाहुण्याचं आगमन झालं.

## जॉली एलएलबी - 3 चित्रपटात मोठा ट्विस्ट!

'जॉली एलएलबी' आणि 'जॉली एलएलबी २' चित्रपटाच्या यशानंतर आता 'जॉली एलएलबी ३' प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. जेव्हापासून 'जॉली एलएलबी ३' चित्रपटाची चर्चा सुरू झाली तेव्हापासून चाहते म्हणत होते की, पहिल्या दोन्ही चित्रपटातील वकील म्हणजेच अभिनेता अक्षय कुमार व अरशद वारसी यांना एकाच केसमध्ये आमने-सामने आणा. आता चाहत्यांची हिच इच्छा पूर्ण होणार आहे. 'जॉली एलएलबी ३'मध्ये अक्षय व अरशद एकत्र पाहायला मिळणार आहेत. बहुचर्चित 'जॉली एलएलबी ३' चित्रपटाच्या शूटिंगला अजमेरमध्ये सुरुवात झाली आहे. अभिनेता अक्षय कुमारने इन्स्टाग्रामवर एक मजेशीर व्हिडीओ शेअर करत शूटिंग सुरू झाल्याची माहिती चाहत्यांना दिली आहे. व्हिडीओमध्ये अक्षय व अरशद आपणच खरा जॉली असल्याचा दावा करताना दिसत आहेत. एकाबाजूला अरशद म्हणतोय, "जगदीश त्यागी उर्फ जॉली, बीए एलएलबी. डुप्लीकेटपासून सावधान." तर दुसऱ्याबाजूला अक्षय म्हणतोय की, "जगदीश्वर मिश्रा, बीए एलएलबी, ऑरिजिनल जॉली (लखनऊ वाले)."या दोघांनंतर व्हिडीओमध्ये सौरभ शुक्ला दिसत असून त्यांनी दोन्ही चित्रपटांमध्ये न्यायाधीश सुंदरलाल त्रिपाठीची भूमिका साकारली होती. व्हिडीओत, सौरभ यांच्या हाती पाटी दिसत आहे; ज्यावर 'जॉली एलएलबी ३' चित्रपटाचं शूटिंग सुरू असं लिहिलं आहे. पण आता खरा जॉली कोण अक्षय कुमार की अरशद वारसी? हे येत्याच काळात स्पष्ट होणार आहे.दरम्यान, २०१३साली प्रदर्शित झालेल्या पहिल्या 'जॉली एलएलबी' चित्रपटात अरशद वारसी झळकला होता. या चित्रपटातील त्याची विनोदी शैली अजूनही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त या चित्रपटात अरशदसह अभिनेते बोमन इराणी होते. दिल्लीमधील एका कोर्टातील ड्रामा या चित्रपटात पाहायला मिळाला होता.त्यानंतर २०१७मध्ये 'जॉली एलएलबी २' चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात लखनऊ कोर्टातील प्रकरण दाखवण्यात आलं होतं. अभिनेता अक्षय कुमार या चित्रपटात जॉलीच्या भूमिकेत झळकला होता. 'जॉली एलएलबी'च्या चाहत्यांनी अक्षयच्या एन्ट्रीवर नाराजी व्यक्त केली होती. पण नंतर अक्षयचा अभिनय आणि चित्रपटाची कथा प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडली.

## माधुरीला 'आंटी' म्हणून मारली हाक



धकधक गर्ल माधुरी दीक्षित नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. कधी तिच्या सोशल मीडियावरील सुंदर फोटोमुळे तर कधी जबरदस्त डान्समुळे चर्चेत असते. सध्या माधुरी 'कलर्स टीव्ही'वरील 'डान्स दीवाने' कार्यक्रमात परीक्षकाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहे. अशातच माधुरी दीक्षितचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. अभिनेत्री माधुरी दीक्षितचा हा व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.व्हॅनिटी वॅनमधून बाहेर येताच अचानक एक महिला आपल्या छोट्या मुलाला घेऊन येते आणि माधुरीच्या मागेमागे धावत येत म्हणते, "माझा मुलगा तुम्हाला भेटू इच्छितो." यावर माधुरी त्या छोट्या मुलाला हॅलो करते. त्यावर ती महिला तिच्या मुलाला म्हणते, "आंटीला हॅलो कर." हे ऐकून माधुरी हसायला लागते. माधुरीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका नेटकऱ्याने प्रतिक्रिया देत लिहिलं आहे, "आंटी काय, आता हिच दीदीचं वय आहे.

# आता बोलण्यासारखं माझ्याकडे काही नाही

## मुंबई इंडियन्सचा संघ 145 धावांवरच मर्यादित राहिला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स संघाने मुंबई इंडियन्सला सर्वबाद करत २४ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना केकेआर संघ १९.५ षटकांत १६९ धावाच करू शकला. ज्यामध्ये व्यंकटेश अय्यरने ७० धावा तर मनीष पांडेने ४२ धावांचे योगदान दिले. लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सचा संघ १४५ धावांवरच मर्यादित राहिला. केकेआरकडून गोलंदाजीत मिचेल स्टार्कने ४ तर आंद्रे रसेल, वरुण चक्रवर्ती आणि सुनील नरेनने प्रत्येकी २ विकेट घेतल्या. केकेआर संघाने या विजयासह १२ वर्षांनंतर मुंबई इंडियन्सला त्यांच्या घरच्या मैदानावर पराभूत करण्यात यश मिळवले आहे.**




मुंबई संघाचा कर्णधार हार्दिक पंड्याने या लाजिरवाण्या पराभवानंतर वक्तव्य दिले आहे, ज्यामध्ये तो म्हणाला, “आम्ही चांगली भागीदारी करू शकलो नाही आणि सातत्याने विकेट गमावल्या, ज्याचा ट्वेन्टी२० मध्ये फटका बसतो. मनात खूप सारे प्रश्न आहेत, पण त्याची उत्तरं मिळायला वेळ लागेल. पण आता बोलण्यासारखं माझ्याकडे फार काही नाही. गोलंदाजांनी खरोखरचं चांगली कामगिरी केली, पहिल्या डावापेक्षा दुसऱ्या डावात खेळपट्टी चांगली झाली. दवही आलं. यानंतर आम्ही आणखी काय चांगलं करू शकतो याचा विचार करू. संघर्ष करत राहणं हे माझं काम आहे, मी नेहमी स्वतला हेच सांगत असतो. आव्हानं येत राहणार, संघर्ष करत राहीन.”या विजयासह कोलकाता नाईट रायडर्सने १० सामन्यांत ७ विजय मिळवून गुणतालिकेत दुसरे स्थान पटकावले आहे. मोठ्या पराभवानंतर मुंबई इंडियन्सचे ११ पैकी ३ विजय आणि ८ पराभवानंतर केवळ ६ गुण मिळवले आहेत आि संघ गुणतालिकेत ९व्या स्थानावर आहे.आयपीएलच्या १७व्या हंगामातील ५१वा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स आमनेसामने आले होते. ज्यामध्ये कोलकाता नाईट रायडर्सने मुंबई इंडियन्सवर २४ धावांनी विजय मिळवत इतिहास रचला. कोलकाताने २०१३ नंतर प्रथमच वानखेडेवर मुंबईला पराभूत केले आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना कोलकाताने व्यंकटेश अय्यरच्या अर्धशतकाच्या जोरावर सर्वबाद १६९ धावा केल्या होत्या. मात्र, प्रत्युत्तरात मुंबईचा संघ १८.५ षटकांत १४५ धावांवर गारद झाला. कोलकातासाठी मिचेल स्टार्कने ४ विकेट्स घेत विजयात महत्त्वाची भूमिका निभावली. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या मुंबई इंडियन्सची सुरुवात खूपच खराब झाली. संघाने ४६ धावांत ३ विकेट्स गमावल्या होत्या. रोहित शर्मा ११ धावा, इशान किशन १३ आणि नमन धीर ११ धावाच करू शकला. सूर्यकुमार यादव खंबीरपणे उभा राहिला, पण दुसऱ्या टोकाकडून सातत्याने विकेट पडत होत्या. सूर्यकुमार यादवने ३५ चेंडूत ५६ धावा केल्या, त्यादरम्यान त्याने ६ चौकार आणि २ षटकारही लगावले. पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. मुंबईच्या इतर कोणत्याच गोलंदाजाला खेळपट्टीवर तग धरता आला नाही. त्याचबरोबर आता मुंबईच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याचा आशा संपुष्टात आल्या. वास्तविक, सामन्याचा गेम चेंजर आंद्रे रसेल ठरला, ज्याने सूर्यकुमार यादवची विकेट घेत सामना केकेआरकडे वळवला, त्याशिवाय त्याने हार्दिक पांड्याची विकेटही घेतली. त्याचबरोबर सुनील नरेन (२), वरुण चक्रवर्ती (२) आणि मिचेल स्टार्कने (४) शानदार गोलंदाजी केली. तत्पूर्वी नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेला कोलकाता नाईट रायडर्स संघ मुंबई इंडियन्सविरुद्ध संघर्ष करताना दिसला. ५७ धावांवर संघाने पाच विकेट गमावल्या. मुंबईच्या गोलंदाजीसमोर सॉल्ट-नरीनसारखे फलंदाज पूर्णपणे फ्लॉप ठरले. या सामन्यात सॉल्टने पाच धावा, रघुवंशीने १३ धावा, श्रेयस अय्यरने सहा धावा, सुनील नरेनने आठ धावा आणि रिंकू सिंगने नऊ धावा केल्या.

### गोलंदाजांची शानदार कामगिरी

या सामन्यात मुंबईच्या गोलंदाजांनी धुमाकूळ घातला. जसप्रीत बुमराहने तीन विकेट घेतल्या. वानखेडे स्टेडियमवर त्याने ५० विकेट पूर्ण केल्या. त्याने रमणदीप सिंग, मिचेल स्टार्क आणि व्यंकटेश अय्यर यांना बाद केले. अय्यरने मुंबईविरुद्ध ७० धावांची शानदार खेळी केली. यादरम्यान त्याच्या बॅटमधून सहा चौकार आणि तीन षटकार आले. त्यामुळे कोलकाता संघाला १९.५ षटकात सर्वबाद १६९ धावा करता आल्या. मुंबईसाठी नुवान तुषाराने तीन, कर्णधार पंड्याने दोन आणि पियुष चावलाने एक विकेट घेतली.वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स संघाने मुंबई इंडियन्सला सर्वबाद करत २४ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना केकेआर संघ १९.५ षटकांत १६९ धावाच करू शकला.

# बुमराह उपकर्णधारासाठी वाईट पर्याय नव्हता!

## हार्दिकला उपकर्णधार करण्यावर इरफान पठाणने उपस्थित केला प्रश्न

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी बीसीसीआयने रोहित शर्माच्या नेतृत्वाखील १५ सदस्सीय संघ ३० एप्रिल रोजी जाही केला आहे.जूनमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२४ साठी टीम इंडियाचा उपकर्णधार हार्दिक पंड्याला बनवण्यात आले आहे. या मोठ्या स्पर्धेसाठी हार्दिक पंड्याला भारतीय संघाचा उपकर्णधार बनवल्यानंतर माजी अष्टपैलू इरफान पठाणने प्रश्न उपस्थित केला आहे**






इरफान पठाणच्या मते, जसप्रीत बुमराहसारखा खेळाडू अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये होणाऱ्या आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाच्या उपकर्णधाराची भूमिका बजावण्यास अधिक सक्षम आहे.वास्तविक, इरफान पठाण आयपीएलच्या अधिकृत टेलिव्हिजन ब्रॉडकास्टर स्टार स्पोर्ट्सवर बोलत होता. तो म्हणाला की, “हार्दिक पंड्या आणि सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वाखाली युवा संघ तयार करणे हा यामागचा उद्देश होता, मात्र हार्दिक पंड्याच्या कामगिरीवर आणि क्रिकेटमधील बांधिलकीवर प्रश्न उपस्थित केले गेले. वर्षभर भारतीय क्रिकेटची सेवा करण्यासाठी देशांतर्गत क्रिकेटमध्ये नियमित सहभाग महत्त्वाचा आहे,दुखापती हा नक्कीच एक पैलू आहे, पण खेळाडूच्या पुनरागमनासाठी योग्य नियोजन महत्त्वाचे आहे. इरफान पठाणने हार्दिक पंड्याला विशेष सूट देण्यावरही टीका केली आहे. इरफान पठाण म्हणाला, “जेव्हा इतर खेळाडू)पाहतात की एका खेळाडूला विशेष वागणूक मिळत आहे,ज्यामुळे एक चुकीचा संदेश जातो. कारण हे क्रिकेट टेनिससारखे नाही, तो एक सांघिक खेळ आहे, जिथे समानता महत्त्वाची आहे. प्रत्येक खेळाडूला न्याय्य आणि समानतेने वागवले पाहिजे.”माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाणचे मत आहे की हार्दिक पांड्या भारताचा उपकर्णधार होण्याचा हक्कदार नाही.

### ज्यामुळे एक चुकीचा संदेश जातो

इरफान पठाण म्हणाला, “म्हणून आता हार्दिक पड्याला उपकर्णधार बनवण्याबाबतच्या तुमच्या प्रश्नाकडे परत येत आहे, नेतृत्वात सातत्य राखण्याला महत्त्व असल्याने त्यामागील तर्क मला समजला आहे. तथापि, सध्याची कामगिरी लक्षात घेता, निवडकर्त्यांनी सातत्य निवडणे अर्थपूर्ण आहे. तरीही, माझा विश्वास आहे की बुमराहसारखा खेळाडू उपकर्णधारासाठी वाईट पर्याय नव्हता. आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी बीसीसीआयने रोहित शर्माच्या नेतृत्वाखील १५ सदस्सीय संघ ३० एप्रिल रोजी जाही केला आहे.विश्वचषक २०२४ साठी टीम इंडियाचा उपकर्णधार हार्दिक पंड्याला बनवण्यात आले आहे. या मोठ्या स्पर्धेसाठी हार्दिक पंड्याला भारतीय संघाचा उपकर्णधार बनवल्यानंतर माजी अष्टपैलू इरफान पठाणने प्रश्न उपस्थित केला आहे.